दि.२८/१२/२०२०

# प्रेसनोट

अभय योजनेअंतर्गत थकीत मिळकतकर भरण्यासाठी कर्ज देण्यासाठी बॅकांचा पुढाकार

मार्च २०१९ पासून पुणे शहरामध्ये कोरोना विष्णाणुचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने सामाजिक व आर्थिक दुष्परिणामासहित नागरिकांना सामोरे जावे लागले होते. या कालावधीत नागरिकांचे आर्थिक परिस्थिती खालावल्याने थकीत मिळकतकरामधील शास्तीवर सवलत देण्याची योजना पुणे महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आली दि. २ आक्टोबर २०२० ते दि. ३० नोव्हेंबर २०२० या कालावधीत ५० लाखापर्यंत थकबाकी असणा-या मिळकतधारकांना शास्तीच्या रक्कमेत ८०% सवलत देण्यात आली. बहुतांशी थकीत मिळकतधारकांनी या योजनेचा लाभ घेतला त्यातुन पुणे महानगरपालिकेस ३५० कोटी एवढे उत्पन्न प्राप्त झाले. तसेच दि. १० डिसेंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये थकीत मिळकतकराचा भरणा करणा-या नागरिकांना ७५% एवढी शास्तीमध्ये सवलत मिळणार आहे. व दि. १ जानेवारी २०२१ ते २६ जानेवारी २०२१ या कालावधीसाठी शास्तीमध्ये ७०% सवलत महानगरपालिकेमार्फत देण्यात येणार आहे.

कोविड-१९ सदृश्य परिस्थितीमुळे अभय योजनेअंतर्गत सवलत देवुनही काही नागरिकांना मिळकतकराचा भरणा करणे शक्य होत नसल्याने सदरची अडचण विचारात घेवून पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील सहकारी बॅक व काही इतर बॅकांना प्रत्यक्ष चर्चेस बोलविण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत सुवर्णयुग सहकारी बॅक लि,सारस्वत सहकारी बॅक लि, जनता सहकारी बॅक लि.यांनी पुढाकार घेतला आहे. त्यानुसार ज्या थकबाकीदारांना मिळकतकर भरण्यासाठी कर्जाची आवश्यकता असेल त्यांनी संबंधित बॅकांकडे संपर्क साधावा या बाबत बॅकेमार्फत बॅकेच्या नियमानुसार कर्ज पुरवठा केला जाईल. कर्जा प्रकरणांमध्ये बॅक, महानगरपालिका व मिळकतधारक यांचेमध्ये समन्वय साधण्यासाठी पुणे महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभाग मुख्य कार्यालय येथे समन्वय कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ०२०-२५५०११५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

सदर तीन सहकारी बॅकाप्रमाणेच शहरातील इतर सर्वच बॅकांनी सदर कामी पुढाकार घेवून पुणे शहराच्या विकासास सहकार्य करावे असे आवाहन पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

२८/१२/२०

विलास कानडे
सह महापालिका आयुक्त
कर आकारणी कर संकलन विभाग
पुणे महानगरपालिका.

Scanned with CamScanner